Maya CARE Foundation
The next best thing to family

# माया केअर फाऊंडेशन

News Letter

✻ वार्तापत्र ✻

वर्ष : 4 थे• अंक : 4 था
जुलै – सप्टेंबर 2025
केवळ खाजगी वितरणासाठी विनामूल्य

# संपादकीय ...

एप्रिल २०२५ या महिन्यात सरासरी जास्तीतजास्त तपमान ३६ डिग्री सेल्सियस तर तेच मे महिन्यात सरासरी ३८डिग्री होते आणि दरवर्षी सर्व साधारणपणे मान्सूनची सुरुवात जूनच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात होते. परंतु यावर्षी मान्सूनची सुरुवात मात्र मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात झाली आहे . पर्यावरणातील बदलांमुळे हे बदल घडलेले असावेत. परंतु अद्यापपर्यंत मान्सून समाधानकारक आहे .

महाराष्ट्र शासनाने फक्त कमी उत्पन्न गटातील लोकांसाठी महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू केली होती. पण आता ती सर्वांसाठी लागू केली आहे या योजनेनुसार आता शासनाने निधारित केलेल्या हॉस्पिटल्स मध्ये कितीही उत्पन्न असलेला माणूस आरोग्यसेवा घेऊ शकतो. ही कॅशलेस सेवा असून यात दीड लाख रुपयांपर्यंतचा खर्च महाराष्ट्र शासना कडुन कडून परस्पर हॉस्पिटल ला मिळतो. ज्येष्ठ नागरिकांसाठी भारत सरकारने १४५६७ या क्रमांकावर ज्येष्ठ नागरिक मदत केंद्र सुरु केले आहे . हे केंद्र सकाळी ८ ते रात्री ८ दरम्यान ज्येष्ठ नागरिकांना आवश्यक असलेली कोणतीही मदत किंवा आधार प्रदान करते . संकटात सापडलेल्या , वैद्यकीय मदतीची आवश्यकता असलेल्या किंवा छळापासून संरक्षण पाहिजे असलेल्या लोकांना सहाय्य करते . तसेच जवळील लसीकरण केंद्रे इत्यादीची माहिती देते . ही माहिती तुमच्या वर्तुळातील सर्व ज्येष्ठ नागरिकांना, तसेच मित्र , नातेवाईक व शेजारी याना द्यावे याचा प्रसार करा म्हणजे मदतीची गरज असलेल्या लोकांना ज्येष्ठ नागरिकांना याचा निश्चितच फायदा होईल .

या पार्श्वभूमीवर वृद्धांना घराबाहेर न पडता सेवा देण्याचे त्याचे समुपदेशन करण्याचे ,त्यांना सोबत करण्याचे आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या मोहिमेपर्यंत प्रत्येक गोष्ट हीच जाणीव करून देतो कि काळ कितीही बदलला तरी मायेचा , सहवेदनेचा ,आणि मदतीचा हात नेहमीच अमूल्य असतो . ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग लोकांच्या गरजा ऐकणे ,त्यांच्यासाठी सोयीस्कर सेवा उपलब्ध करून देणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांना मानवी सन्मान आणि आत्मसन्मान देणे हे मायाकेअरने आपले उद्दिष्ट ठेवले आहे  आणि या तिमाहीत सुद्धा आम्ही त्या दृष्टीने वाटचाल केली आहे

ही तिमाहि संपेपर्यंत आमच्या स्वयंसेवकांनी सुमारे ४५०० इतक्या ज्येष्ठ नागरिकाना आत्तापर्यंत ३६००० पेक्षा जास्त वेळा त्यांच्या घरी जाऊन मदतीचा हात आमच्या संस्थेने दिलेला आहे .तसेच सुमारे ४५०० वृद्धाश्रमात जाऊन तेथील वृद्धांना भेट देऊन त्यांच्या गरजा पूर्ण केल्या आहेत. तसेच आमच्या बॅक ऑफिस मध्ये काम करणारे सर्व दिव्यांग आहेत तसेच सुमारे १०० पेक्षा जास्त दिव्यांग व्यक्तींना प्रशिक्षण देऊन नोकऱ्या मिळवून दिलेल्या आहेत. यात ८०% महिला आहेत. गेल्या तिमाहीत आम्ही ॲमेझॉन , गोडेरा या संस्थांच्या सहकार्याने २५० इतके प्रथमोपचाराचे किट्स पुण्यातील ज्येष्ठ नागरिकांना तसेच वृद्धाश्रमांना उपलब्ध करून दिले आहेत तसेच चेन्नई मधील ज्येष्ठ नागरिकंना ५० व बंगलोर मधील ज्येष्ठ नागरिकांना ५० प्रथमोपचाराचे किट्स उपलब्ध करून दिले आहेत. तसेच बंगलोर शहरातील ज्येष्ठ नागरिकांना या संस्थेच्या मदतीने आम्ही, ७५ वॉकर्स तसेच पुण्यातील ज्येष्ठ नागरिकांना ३० वॉकर्स उपलब्ध करून दिले आहेत तसेच बंगलोर शहरातील ज्येष्ठ नागरिकांना या संस्थेच्या मदतीने आम्ही १० व्हीलचेअर्स तसेच पुण्यातील ज्येष्ठ नागरिकांना १० व्हीलचेअर्स उपलब्ध करून दिले आहेत तसेच हैद्राबाद शहरातील ज्येष्ठ नागरिकांना या संस्थेच्या मदतीने आम्ही १२ व्हीलचेअर विनामुल्य उपलब्ध करून दिले आहेत .

आमच्या संस्थेच्या स्वयंसेविका श्रीमती विनिता महाजन यांना यावर्षी पतंजली योग साधक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे . त्यांनी सलग ८ वर्षे उपस्थिती दाखवल्याबद्दल हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

# लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया

तुमची ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत सेवा माया केअर फाउंडेशन तर्फे मला मिळाल्याबद्दल मनापासून धन्यवाद. तुमची माया केअर सेविका दिपाली जाधव यांनी मला दवाखान्यात नेण्यासाठी मदत केली माझ्या सोबतीला कोणाला यायला वेळ नसतो, परंतु दिपाली मला संपूर्ण वेळ देऊन दवाखान्यात नेते घरी येऊन माझा योगा करून घेते आणि आज खरच मला अशा सेविकेची गरज होती आणि पुढेही गरज राहणार आहे तुमची सेविका दिपाली खूप आवडली आहे. खूप छान प्रकारे मदत केली आणि खरच तिचे खूप धन्यवाद आणि विशेष म्हणजे माया केअर फौंडेशनचे खूप धन्यवाद. अशी सेविका मुलगी दिल्याबद्दल मनापासून धन्यवाद.

माधुरी बासूदक मुंबई.९६५३६३८८०३

***

माझे नाव सुंदर एस.शिंदे आहे. माझ वय ६७ वर्ष आहे. मी गुरवली पाडा (टिटवाळा) येथे राहते. मी आपल्या माया केअर फाऊंडेशन याची गेल्या, १ वर्षापुन्हा सेवा घेण्यासाठी, मला अनुजा कदम मॅडम या नेहमी मदत करत असतात. मी BP-Dibetic patient असल्यामुळे नेहमी मला डॉक्टर कडे जनस्थी,औषध अण्ण्याकरिता, तशेच बॅंकेशी संबंधित काही काम अस्ल्या दुसऱ्याची मदत घ्यावी लगायची, पण जेवहा पासुन माया केअर च्य अनुजा मॅडम ह्यांच्याशी माझी त्याच्या त्या माझ्याशी संबंधित कामासाठी मदत करतत. त्या बद्दल त्यांचे आणि विषेशत: माया केअर फाउंडेशन चे खुप– खुप धन्यवाद

सुंदर शिंदे, मुंबई. ८५९१९०३०२३

***

॥ श्री ॥

पुणे२९
१·६·२०२५

मायाकेअर फाऊंडेशन
माधुरी ताई / मॅडम

मी अनुश्री केतकर काही महीन्यापासून 'मायाकेअर' संस्थेच्या संपर्कात आहे. माझ्यावर आलेल्या वाईट प्रसंगानंतर मला तुमच्या संस्थेची मदत झाली.

अचानक ओढवलेल्या माझ्या यजमानांच्या मृत्यूनंतर या संस्थेने मला सहकार्य दिले.

पहील्यापासून श्रीमति विनिता महाजन यांनी मला चांगले सहकार्य दिले. त्यांची मदत करण्याची इच्छा, पद्धत चांगली वाटली. दरवेळी मला त्यांचा आधार वाटला. मंगेशकर हॉस्पिटलला डोळ्यांच्या तपासणीकरीता सोबत, स्मार्टफोनला, कॉर्पोरेशन ऑफीसला, बँकेत जायला, वाघोड उद्यानात जायला सोबत व मदत झाली. मला चक्कर येण्याचा त्रास असल्याने रस्त्याने हात धरून नेणे केले. काही वेळा मार्ग सुचत नसल्यास योग्य मार्गदर्शन करुन काम पुर्ण करुन घेणे/देणे झाले. त्यांचा मूळात स्वभाव चांगला असल्याचे जाणवले. मी त्यांची व संस्थेची आभारी आहे. आपली संस्था व सहकारी हे विनामूल्य करतात ही समाजसेवा वाखाण्याजोगी / कौतुकास्पद आहे.

आपली विश्वासू
श्रीमति अनुश्री केतकर

वीणाताई, मला बरं नसताना तुम्हाला फोन केल्यावर तुम्ही लगेच माझ्या घरी आल्या. व माझ्याबरोबर छान गप्पा मारुन मला दुखण्यातून बाहेर येण्यास मदत केली, त्याबद्दल तुम्हाला खुप धन्यवाद. तुमचा स्वभाव व गोड बोलणे खुप छान. मला तुम्ही माझी जवळची मैत्रिण वाटलात. माय केअर खुप छान सामाजिक कार्य करत आहे.

श्यामल मुजुमदार.

# माया केअर वृत्त

१) ११ ते १३ एप्रिल २०२५ महाराष्ट्र चित्पावन महिला मंच तर्फे सप्तपदी हॉल येथे आयोजित प्रदर्शनात माया केअरने सहभाग घेतला.  यामध्ये संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यात आली.

२) १२ एप्रिल २०२५ 3rd Socia CSR Film Festival  -wards Function मध्ये माया केअरच्या लघुपटाला विशेष सन्मान मिळाला. ही संस्था आणि तिच्या कार्याची मोठी पावती ठरली.

३) १४ एप्रिल २०२५ –Amazon आणि Goodera CSR अंतर्गत आयोजित वॉकर वाटप कार्यक्रमात माया केअरने सक्रिय सहभाग घेतला. गरजू ज्येष्ठ नागरिकांना सहाय्य करणारा हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला.

४) १४ मे २०२५ मेमरी क्लब कोथरूड यांच्या वतीने वीणा जोग व विनीता महाजन यांची ऑनलाईन मुलाखत घेण्यात आली. यामध्ये त्यांच्या अनुभव व कार्याची प्रेरणादायी चर्चा झाली.

५) १८ मे २०२५ रोजी चंद्रपूर येथील मातोश्री वृद्धाश्रमात माया केअर च्या वतीने भजन कार्यक्रम संपन्न झाला.

६) २१ मे २०२५ मराठवाडा कॉलेज येथे वृद्धांसाठी आयोजित काठी प्रशिक्षण कार्यशाळेत अन्नपूर्णा, मकरंद निमोणकर व विनीता महाजन यांनी सहभाग घेतला.

७) २६ मे २०२५ –Amazon आणि Goodera CSR च्या सहकार्याने व्हीलचेअर व प्रथमोपचार साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे अनेकांना थेट मदत मिळाली.

८) ३१ मे २०२५ माया केअरच्या वीणा जोग यांनी मॅरेथॉन मध्ये भाग घेऊन आरोग्यप्रेमी व सक्रिय वृद्धत्वाचे उत्तम उदाहरण सादर केले.

९) ३ जून २०२५ पंडित फार्म येथे आयोजित ज्येष्ठ नागरिक मेळाव्यात माया केअरच्या स्टॉलद्वारे संस्थेचे कार्य सादर करण्यात आले. या प्रदर्शनासाठी स्वयंसेवक गजानन ढोरे यांनी विशेष प्रयत्न केले.

१०) २१ जून २०२५ जागतिक योग दिनानिमित्त वृंदावन वृद्धाश्रम, आनंदनगर येथे विशेष योगकायक्रम सादर करण्यात आला. यामध्ये वृद्धांच्या आरोग्यासाठी योगाचे महत्त्व अविनाश ठाणावाला यांनि सांगितले.

११) २१ जून २०२५ आयनॉक्स मॉल, मुंबई येथे सितारे जमीन पर या चित्रपटाच्या विशेष स्क्रीनिंग प्रसंगी माया केअर मुंबई टीमने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## श्रध्दांजली

**गेल्या तिमाहीत खालील लाभार्थी ज्येष्ठ नागरिकांचे निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.**



मनोहर पाटील
२४ एप्रिल २०२५

माधव मोरेश्वर भट
१२ मे २०२५

माया पेंडसे
१४ मे २०२५

मधुकर शंकर कुलकर्णी
१६ मे २०२५

जिजाबाई सोडस्कर
१४ जून २०२५

सुलभा देशपांडे
१६ जून २०२५

अशोक कांबळे
१९ जून २०२५



# आमची बिंदू टीम : अपंगावर मात करून बाजी.

१. **प्रीतम दास, कोलकत्ता.**


प्रीतम दास

प्रीतम चा जन्म १९९१ ला कोलकत्ता पश्चिम बंगाल येथे झाला. प्रीतम ने २००७ मध्ये संगणक अभियंता होण्याच्या प्रवासाला सुरुवात केली होती. परंतु २००८ रोजी प्रीतम चा अपघात झाला. त्यामुळे प्रीतमला अपंगत्व आले व व्हीलचेअरवर यावे लागले. अचानक घडलेल्या या घटनांमुळे प्रीतम खूप खचून गेला होता. त्याने ३ वेळा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु सुदैवाने तो बचावला. त्यानंतर प्रीतमला मानसोपचार तज्ञांकडून पुढील आयुष्य जगण्याचा चांगला सल्ला मिळाला. त्यानंतर प्रीतमने स्वतःला स्वीकारले व नवीन आयुष्याची सुरुवात करावयाचे ठरवले.

२०२१ मध्ये तो बिंदू प्रकल्पामध्ये सामील झाला. त्याने सुरुवातीला कॉर्पोरेट देणगीदार यांना शोधणे व त्यांच्यासोबत मीटिंग घडवून आणणे या प्रकारची कामे केली. प्रीतम च्या माध्यमातून **WNS** हा प्रकल्प माया केअरला मिळाला. हे त्याचे पहिले मोठे यश होते. अपघातानंतर त्याच्या स्वप्नांना अनपेक्षित वळण जरी मिळाले असले तरी आयुष्य बदलणाऱ्या या घटनेनंतरही प्रीतमच्या दृढ निश्चय आणि लवचिकतेमुळे त्याला माया केअर चा आधार मिळाला आहे.

आज प्रीतम माया केअर मध्ये एक टीम मॅनेजर आहे जिथे तो विविध प्रकल्पांच्या सुरळीत अंमलबजावणीची खात्री करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. प्रीतमची कहाणी केवळ वैयक्तिक विजयाची नाही तर मानवी आत्म्याच्या सामर्थ्याची आणि अधिक समावेशक आणि सक्षम समुदाय निर्माण करण्यात एक व्यक्ती किती प्रभाव पाडू शकते याची एक शक्तिशाली आठवण करून देते.

२. **संतोष तुळजापुरे, मुंबई.**


संतोष तुळजापुरे

संतोष चा जन्म १९८७ ला मुंबई येथे झाला. वडिलांची स्वतःची रिक्षा होती व आई घरकाम करायची.संतोषने इतिहास विषयामध्ये पदवी पूर्ण केली होती.

परंतु मे २०१५ रोजी संतोष घराच्या वरच्या मजल्या वरून पडला. त्यामुळे त्याच्या मणक्याला जोराचा मार लागला व त्याच्या नशिबी अपंगत्व आले. त्याच्या कमरेपासून खालच्या भागातील संवेदना व हालचाली पूर्णपणे बंद झाल्या होत्या. या घटनेमुळे तो खचून गेला होता. परंतु आईने त्याची समजूत काढली व त्याला जीवन जगण्याचा आत्मविश्वास दिला. २०१८ मध्ये वाशी मधील शरण पॅराप्लीजिंग सेंटर मध्ये तो दाखल झाला. तिथे त्याने अपंगत्वावर मात करण्याचे कौशल्य आत्मसात केले. परंतु २0२0 साली संतोष च्या आईचे आजारामुळे निधन झाले. त्यामुळे संतोष पुन्हा खचला व नैराश्य मध्ये गेला.

२०२२ साली माया केअर मध्ये तो सामील झाला. त्याला डेटा एन्ट्री करण्याचे काम दिले. त्यामध्ये तो अवगत झाला व अतिशय चांगल्या पद्धतीने डेटा एन्ट्री करू लागला. त्यानंतर त्याने **SVP** मुंबईमध्ये प्रकल्प समन्वयक म्हणून डेटा एन्ट्री व छोटी मोठी कॉलिंग ची कामे केली. ही कामे त्याच्या हातून अगदी चांगल्या रीतीने झाली त्यामुळे त्याला चांगले पैसेही मिळू लागले. त्यानंतर त्याने जोमाने काम करायचे ठरवले व विविध गोष्टी आत्मसात केल्या. संतोष आज **SVP** मुंबई प्रकल्पावरती समन्वयक म्हणून काम करत आहे. माया केअर मुळे त्याच्या जीवनामध्ये मोठा बदल झाल्याचे संतोष नेहमीच त्याच्या सहकाऱ्यांना सांगत असतो. मी शेवटपर्यंत माया केअर मध्ये प्रामाणिक काम करून माया केअरला मोठ्या स्तरावर घेऊन जाण्यासाठी मदत करीन असे तो विश्वासाने सांगत असतो.

# स्वयंसेवकांचा अनुभव

अतुल बाविस्कर: एकदा माझी सकाळी फिरताना या काकांची प्रथम जवळून भेट झाली. अंगात बरेच दिवस न धुतला गेलेला सदरा आणि हातात काठी होती. उंची पावणेसहा फूट, शिडशिडीत बांधा. मला ते म्हणाले मला काहीतरी खायला द्या. मी त्यांना नादब्रह्म इडली मध्ये इडली खायला दिली. मीही खाल्ली. नंतर मी त्यांना हे कळू दिले नाही की इतर बऱ्याच वेळा आधी मी त्यांना असे खायला मागताना पाहिले होते. बरेच जण नियमित त्यांना चहा आणि खाण्यास देत असत. काही दुकानदार चहाचे पैसे ते एकटे असले तर कधीच घेत नसत. मी त्यांच्या बरोबर असताना मात्र मीच त्यांच्या चहाचे पैसे देणार अशी दुकानदारांची खात्री असे. पुढे दोन तीनदा मला ते दिसले आणि आम्ही हसून एकमेकांना अभिवादन केले. त्यांचे वय ६३ असले तरी ते ७० वर्षांवरील वाटतं होतें. मला मग एकदा वाटले की याना नक्कीच माया केअर संस्थेच्या सेवांची गरज आहे आणि मी त्यांना हेल्पलाईन ला फोन करायला सांगितले. त्यांनी लगेच केला आणि मी त्यांची सेवा सुरू केली.

त्यांचा पुण्यात मोठा duplex बंगला आहे. पण म्हणून त्यांची आर्थिक स्थिती मजबूत आहे असे बिलकुल म्हणता येणार नाही. तो बंगला वडिलोपार्जित आहे आणि कसाबसा टिकवला आहे असे ते सांगत. सध्या त्यांना काहीच कामधंदा नव्हता. त्यांची पत्नी काही interior ची वगैरे कामे कमिशन बेसिस वर मिळवत असे पण त्यात खूप आर्थिक ओढाताण होत असे. आपल्या पत्नी आणि मुलाचे ते नेहमी कौतुक करत. दुर्दैवाने त्यांचा मुलगा त्यांच्याशी बोलत नव्हता. मुलगा हुशार असून त्याने इंजिनियरिंग केले आहे. पण त्याला नोकरी नव्हती. आणि हे सर्व वडिलांचा पायगुण अशी त्याची समजूत होती. ते कोकणातील अशा भागातले जेथे काळी जादू चालते. हाच वडिलांचा प्रताप आहे असे त्याला वाटे. मुलगा आणि वडिलांचे पटत नसल्याने त्यांना पत्नी, वरच्या खोलीतच दिवसा तासन् तास राहायला सांगत असे. दार बंद करून. सकाळी लवकर ते बाहेर पडत, कुणीतरी लिफ्ट देत असे विशेषतः कोण ना कोण विद्यार्थी त्यांना लिफ्ट देई आणि ते शंकर महाराज मठ धनकवडी येथे जात असत. येथे प्रसादाची खिचडी घेऊन मग थोडी खिचडी बांधून घेऊन घरी दुपारी येत आणि वरच्या खोलीत बसत. मुलाचा अबोला होताच. पत्नी सुद्धा त्यांच्यावर बऱ्याच वेळा वैतागत असे. मी स्वतः त्यांना पी एम पी एम एल पास काढून एक दोनदा धनकवडी मठात घेऊन गेलो. नंतर बऱ्याच वेळा पदरचा खर्च करून मदत केली. संस्था फक्त मानसिक आधार देते हे कळायला त्यांना कित्येक महिने लागले. पण माझ्या मनात करुणा असल्यामुळे त्यांना मी मदत करायचो. मग मला त्यांनी आपल्या बद्दल सांगितले. ते वयाच्या चाळिशीत जुहू येथे अमिताभ बच्चन यांच्या जलसा बंगल्यासमोर एका हॉटेलात वेटर ची नोकरी करायचे. त्या नोकरीत अनेक अभिनेत्यांची त्यांची भेट व्हायची. नंतर ते शेफ झाले. कालांतराने ती नोकरी सुटली. त्यांनी कुली चित्रपटात mob शूटिंग मध्ये भाग घेतला आहे असे कळले. सुरुवातीस मुंबई आणि नंतर ते पुण्यात आले. जेव्हा त्यांचे पुण्यातील घर त्यांचे वडिलांनी त्यांच्या नावावर केले तेव्हा पुण्यात असताना त्यांनी काही वर्षे विद्यार्थी खानावळ चालवली पण नंतर ती बंद पडली. नंतर काही काळ त्यांनी वॉचमन ची नोकरी केली. पण गृहकलहामुळे ते थकले होते आणि अकाली वृद्ध दिसत म्हणून तेथून त्यांना कमी करण्यात आले. मी त्यांना नियमित सहवास देणे सुरू केले होते.

त्यांचा वाढदिवस देखील त्यांच्या घरी जाऊन मी साजरा केला. त्यांना खूप आवडले आणि भरून आले. नंतर काही दिवसांनी त्यांचे बीपी खूप वाढले. त्यांनी मला नवले हॉस्पिटल ला घेऊन जाण्यास सांगितले. मी बसने घेऊन गेलो. तपासणी मोफत असली तरी औषधाचा खर्च मी केला. तेथील गोळ्या त्यांना लागू पडल्या आणि त्याबद्दल त्यांनी आणि पत्नीने माझे कौतुक केले. पण त्यांचे कौटुंबिक प्रॉब्लेम चालूच होते. ब्लड प्रेशर मध्ये चढ उतार व्हायचा. अगदी सकाळी सहाला ते मला बऱ्याच वेळा फोन करायचे आणि बोलवायचे.

नंतर काही दिवसांनी माझा दोन चार दिवस त्यांचेशी संपर्क नव्हता. अशा वेळी मी स्वतःहुन उपेक्षित वृद्धांना फोन करत असतो. फोन केल्यावर त्यांच्या पत्नीकडून कळले की त्यांना अर्धांग वायूचा तीव्र झटका आला आहे. मी लगेच जाऊन भेटलो. ते बेडवर होते. हा आजार बरा होणे अशक्य आहे असे मला वाटले. अशा आजारात मनोधैर्य लागते पण ते घरातील समस्यांमुळे पार खचून गेले होते. पण चार दिवसांनी त्यांना रक्ताच्या उलट्या होऊन त्यांचे निधन झाले. असा होता आमचा ८ ते १० महिन्याचा सहवास!!

:– महेश कुलकर्णी स्वयंसेवक पुणे



मुंबई येथील वुमन्स वेल्फेअर वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना ब्लँकेट व किट वाटप करत असताना माया केअरचे स्वयंसेवक.



मातोश्री वृद्धाश्रम चंद्रपूर येथे भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



3rd सी एस आर सोशीओ फिल्म फेस्टिवल मध्ये बिंदू टीमच्या संध्या अत्राम यांच्या फिल्म ला सर्वोत्कृष्ट फिल्म पुरस्कार मिळाला तो पुरस्कार स्वीकारताना माया केअर सदस्य.



मुंबईतील केडीएमसी हॉस्पिटलमधील, माया केअर हेल्प डेस्क ला १ वर्ष पूर्ण झाल्याचा आनंद साजरा करताना मुंबई स्वयंसेवक व बिंदू सदस्य.



आमचे अकोल्याचे व लाभार्थी जुरुदक्ष वलेशा यांना सहवासासाठी मदत करत असताना आमच्या स्वयंसेवीका रेणुका तायडे



आमच्या सांगलीच्या लाभार्थी कल्पना गाझी यांना सहवासासाठी मदत करत असताना आमचे स्वयंसेवक प्रवीण गायकवाड



आमच्या अमरावतीच्या लाभार्थी मंदा ओंकाराव उत्खेडे यांना मोबाईल शिकवत असताना आमच्या स्वयंसेविका वैष्णवी भिसेकर



आमचे सोलापूरचे लाभार्थी अंबादास गरड यांना औषधांसाठी मदत करत असताना अमच्या स्वयंसेवीका शुभांगी जाधव



आमच्या सोलापूरचे लाभार्थी शिल्पा हायपरगी यांना औषधांसाठी मदत करत असताना आमचे स्वयंसेवक सुरेश कुलकर्णी



पुणे येथील अर्पण केअर सेंटर मध्ये वृद्धांना वॉकर वितरित करताना आमचे स्वयंसेवक मकरंद निमोणकर



पुणे येथील आई वृद्धाश्रम बावधन येथील वृद्धांना वेलनेस किट वाटप करत असताना आमचे स्वयंसेवक अरुण तांबे



पुणे येथे ॲमेझॉन ऑफिसमध्ये वॉकर वर्कशॉप साठी उपस्थित असताना माया केअर स्वयंसेवक निमोणकर, संजय भक्त, व स्वाती मॅडम.



आयनॉक्स मॉल मुंबई येथे 'सितारे जमीन पर' या चित्रपटाच्या स्क्रीनिंग प्रसंगी माया केअर मुंबई स्वयंसेवक व बिंदू टिम.



पंडित फार्म येथील ज्येष्ठ नागरिक मेळाव्यामध्ये माया केअर च्या स्टॉलवर उपस्थित असताना गजानन ढोरे सर्व इतर स्वयंसेवक



आमचे पुण्याची लाभार्थी श्री. व सौ. नाडकर्णी यांच्यासोबत आमच्या स्वयंयेविका अरुणा अवतारमणी



पुणे येथील कृपासिंधू वृद्धाश्रमामध्ये वृक्षारोपण करत असताना आमच्या स्वयंसेविका विनिता महाजन

**Maya CARE Foundation**

The next best thing to family

भावनिक/बौद्धिक /औपचारिक समर्थनासाठी वरिष्ठ नागरिकांना
मोफत 90 मिनीटांच्या भेटी

**✻ सेवा ✻**

त्यांना डॉक्टर / रेडियोथेरेपी / लसीकरण / सामाजिक कार्यक्रम
थिएटर / बँक / कागदपत्रे / लेखन / वाचन / खरेदी /
गॅझेटस वापरुन / व्हिडिओ कॉल करण्यात मदत

## MAYA CARE NATIONAL HELPLINE : 1800 572 1343

| CITY | FOR WHATSAPP |
| --- | --- |
| मुंबई,पुणे,कोल्हापूर,सांगली,सातारा,सोलापूर,लातूर, नागपूर,नाशिक,परभणी,अहमदनगर,छ.संभाजीनगर,जालना,जळगाव,धुळे,अमरावती,वर्धा,अकोला,बुलढाणा,यवतमाळ, चंद्रपूर,बीड,नंदुरबार,बेंगलोर,हैदराबाद,चेन्नई,दिल्ली,सुरत,वडोदरा,अहमदाबाद,गांधीनगर,कच्छ,चंदीगड,जालंधर,लुधियाना,अबोहर,जबलपूर,उज्जैन,भोपाळ,छतरपुर,ग्वाल्हेर ,इंदोर,रीवा,झांसी,लखनऊ,कानपूर,कोइंबतूर,पाँडिचेरी,पानिपत,गुवाहाटी,हहलखंडी,भुवनेश्वर,अंगूल,संबलपूर,जयपुर,जोधपुर,उदयपूर,ढोलपूर,जैसलमेर,बराण,कोची, तिरुअनंतपुरम,कोलकत्ता,पूर्व मिदनापूर,पश्चिम मिदनापूर,हावडा,बांकुरा,मालदा,उत्तर २४ परगणा,हरिद्वार,डेहराडून, इंग्लंड-लंडन, केंब्रिज, मिल्टन केन्स, मँचेस्टर. | 9552510400<br>9552510411<br>8055995966 |

**Website - www.mayacare.org | Email : service@mayacare.org**

तुम्ही जेष्ठ नागरिक आहात आणि तुम्ही एकटे किंवा दुकटे राहात आहात किंवा जेष्ठ नागरिक आहात आणि कुटुंबात राहात आहात पण अपंग आहात तर आम्ही आपल्याला संपूर्णपणे मोफत मदत करू शकतो:

१) किराणा , भाजी , फळफळावळ औषधे आणून देणे .
२) डॉक्टरकडे , घेऊन जाणे आपण रुग्णालयात दाखल असल्यास आय सी यु च्या बाहेर थांबणे .
३) आपल्याला धार्मिक किंवा इतर पुस्तके, वृत्तपत्रे वगैरे वाचून दाखविणे, लेखन करणे .
४) आपल्या बँकेत जाऊन पैसे काढणे ,पैसे भरणे, चेक भरणे .मुदत ठेव नुतनीकरण करणे
५) आपल्याला एसटी स्टँड , रेल्वे स्टेशन , विमानतळ येथे पोंहचविणे किंवा तेथून घरी सुखरूप पोहचविणे .
६) मोबाईल फोन वापरणे , कॉम्प्युटर वापरणे इत्यादी साठी मदत करू .
७) या शिवाय इतर अनेक गोष्टीसाठी आम्ही तुम्हाला मदत करू.
८) दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल पुणे, लायन ताराचंद बापा हॉस्पिटल मुंबई, जनरल हॉस्पिटल के आर पुरम बंगलोर, सरदार वल्लभ भाई पटेल हॉस्पिटल, नवी दिल्ली, सेंटर पॉईंट हॉस्पिटल नागपूर , के डि एम सी हॉस्पिटल मुंबई येथे विनामुल्य रुग्ण सेवा.

देणगीसाठी **QR Code**

**माया केअर कोणतीही नर्सिंग आणि तातडीची सेवा देत नाही.**

**✻ आपले अभिप्राय व सुचना यांचे स्वागत आहे. आपण ई-मेल करुन कळवू शकता.**

**देणगीसाठी आयकर सवलत आहे.**

**NAME OF THE A/C - MAYA CARE FOUNDATION**

**NAME OF THE BANK : ICICI BANK LIMITED** (BRANCH : TILAK ROAD,PUNE)
**ACCOUNT NO. : 187501000462**
**IFSC CODE : ICIC0001875**

**PRINTED MATTER**

बुक-पोस्ट

**FROM,**

**माया केअर फाऊंडेशन**
**1214 शुक्रवार पेठ, आफ्रिका हाऊस,**
**सुभाषनगर, गल्ली नं.04, पुणे - 411002.**

केवळ खाजगी वितरणासाठी / विनामूल्य

Printed At - Sane & Shinde Associates
Tel.: 020-24477059

**TO,**

श्री/श्रीमती ____________________